दिनांक  21/03/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.153

विषय –  नगपरिषदेकडील विविध कामांची एक वर्षावरील बिले / डिपॉझिट अदा करणेबाबत निर्णय घेणे.

संदर्भ- 1) दिनांक 06/02/2023 ने आरोग्य निरिक्षक व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

नगपरिषदेकडीकल विविध कामांची एक वर्षावरील बिले/ डिपॉझिट अदा करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

1) यशवंत हमाल कामगार मजूर सह.संस्था, भाळवणी सन मे 2013 ते जुलै 2015 अखेर र.रू.2,75,786/-
2) भैरवनाथ एन्व्हायरमेंट सोल्युशन प्रा.लि, विटा सन जुन 2011 ते जानेवारी 2013 अखेर र.रू.3,58,333/-
3) गजानन रामचंद्र निकम सन ऑगस्ट 2015 ते मार्च 2016 अखेर र.रू.1,42,458/-

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक 21/03/2023 रोजीचा प्रशासकिय ठराव क्र.154

विषय – नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन भूमी येथे घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत कच-यावर प्रक्रिया करणे व त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करणे, घनकच- पापासून Manual कंपोस्ट तयार करणे, घनकच-याचे शास्त्रोक्त पध्दतीने भूभरण करणे बाबत निर्णय घेणे.

संदर्भ- दिनांक 21/03/2023 ने विभाग प्रमुख व मुख्याधिकारी यांचे मंजूर टिपणीनुसार.

स्वच्छ भारत अभियानांतर्गत स्वच्छ सर्वेक्षणच्या दृष्टीने नगरपरिषद हद्दीमध्ये संकलन केलेल्या कच-यावर दररोज 100% प्रक्रिया होणे महत्वाचे आहे. त्यादृष्टीने नगरपरिषदेच्या घनकचरा व्यवस्थापन भूमी येथे संकलन केलेल्या कच-यावर घनकचरा व्यवस्थापन अंतर्गत प्रक्रिया करणे व त्याची शास्त्रोक्त पध्दतीने विल्हेवाट करणे, घनकच-यापासून Manual कंपोस्ट तयार करणे, घनकच-याचे शास्त्रोक्त पध्दतीने भूभरण करणे आवश्यक आहे. सदर कामाची मुदत दि.30 एप्रिल 2023 पर्यंत असून त्यापुढे मान्यता न घेतलेस सदरचा खर्च हा नगपरिषद फंडातुन करावा लागणार आहे. तरी सदरचे काम सन 2018-2019 स्वच्छ सर्वेक्षणमध्ये उच्चतम कामगिरी करणा-या नागरी स्थानिक स्वराज्य संस्थाना देण्यात येणा-या प्रोत्साहनात्मक बक्षीस रक्कम अंतर्गत करणेस मंजूरी देत आहे. याकामी पुढील आवश्यक ती नियमबध्द कार्यवाही करणेत यावी.

सही/-
( संतोष भोर)
प्रशासक
विटा नगरपरिषद, विटा

दिनांक - 21/3/2023 रोजीचा प्रशासकीय ठराव क्र.155

विषय :- स्वच्छ भारत अभियान नागरी 2.0 अंतर्गत विटा नगरपरिषद विटा करिताघनकचरा व्यवस्थापन प्रकल्प तयार करणे.

संदर्भ :- 1. दिनांक 21/03/2023 ने आरोग्य निरीक्षक व मुख्याधिकारी यांचे मंजूर पणीनुसार.

स्वच्छ भारत अभियानात सातत्य राखण्याच्या दृष्टीने व संपूर्ण नागरी भारत कचरा मुक्त करण्याच्या दृष्टीने सामुदायिक व सार्वजनिक शौचालयांकरिताच्या गुंतवणूकीमध्ये सातत्य राखणे, वापरलेले पाणी व मैला आणी प्रक्रिया, विल्हेवाट, व पुनर्वापर करणे, सर्व प्रकारच्या घनकचऱ्याचे व्यवस्थापन करणे व जुना साठलेला कचरा, प्लास्टिक कचरा, बांधकाम व पाडकाम कचरा इत्यादींची विल्हेवाट लावणे व व्यवस्थापन करणे व याकरिता आर्थिक बदल करणे इत्यादी गरजा विचारात घेऊन केंद्र शासनाच्या गृहनिर्माण तथा नागरी कार्य मंत्रालयाद्वारे "स्वच्छ भारत अभियान नागरी 2.0” चा प्रारंभ करण्यात आला आहे. सदर अभियान दिनांक 2 ऑक्टोबर, 2021 ते दिनांक 1 ऑक्टोबर 2026 पर्यंत राबविले जाणार आहे. सर्व नागरी स्थानिक स्वराज्य संस्थानी स्वच्छ भारत अभियान 2.0 अभियानांतर्गत सर्व मंजूर प्रकल्पासाठी घनकचरा आणि मलनिस्सारण सबंधित सर्व प्रकल्प विहित कालमर्यादेत व योग्य प्रकारे पूर्ण करणे गरजेचे आहे यासाठी या प्रकल्पांची कामे वेगाने व सक्षमपणे अंमलबजावणी करण्यासाठी नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांकरीता मार्गदर्शक सूचना निर्गमित करण्यात आल्या आहेत.

कार्यालयीन टिपणीमध्ये नमुद केले नुसार् घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प या अभियानांतर्गत मंजूर झालेल्या प्रकल्पांचे सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करणे, निविदा प्रक्रिया राबविणे व प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करण्यासाठी संस्थांची विभागनिहाय नामिकासूची (empanelment) तयार करण्यात आली आहे नागरी स्थानिक स्वराज्य संस्थांनी सदर नामिकासूचीतील संस्थांकडून घनकचरा व्यवस्थापनाचा सविस्तर प्रकल्प अहवाल तयार करून घेणे बाबत सूचना प्राप्त आहेत. नामिकासूची मधील पुणे विभागातील तीन संस्थाना इमेलद्वारे संपर्क केला असता समर्थ इंजिनिअर्स पुणे यांनी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून काम करणेसाठी तयार असले बाबत इमेल द्वारे संपर्क केला आहे. तरी स्वच्छ भारत अभियान नागरी 2.0 अंतर्गत विटा नगरपरिषद विटा करिता घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प तयार करणे करिता समर्थ इंजिनिअर्स पुणे याना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार म्हणून नेमणे हरकतीचे नाही.

सदर् प्रकल्प किंमत रक्कम रु.5 कोटीच्या आत असेल तर प्रकल्प किंमतीच्या 2.45% इतकी फी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना आदा करावी लागणार आहे. कार्यालयीन टिपणीमध्ये नमुद केले नुसार् विटा नगरपरिषदेसाठी च्या घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प अंदाजे रक्कम रु.2.14 करोड इतक्या किंमतीचा होऊ शकतो. तरी प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार यांना प्रकल्प किंमतीच्या 2.45% इतके शुल्क आदा करणे आवश्यक आहे. सविस्तर प्रकल्प अह्वाल सादर केलेनंतर 0.98%, सर्व मान्यता मंजुरी घेउन निविदा प्रक्रिया राबविले नंतर 0.25%, प्रकल्प अंमलबजावणी वेळी व्यवस्थापन केलेनंतर 1.23% असे 3 टप्प्यात सदर शुल्क आदा करणेचे आहे. सदर शुल्क नगरपरिषद फंडातुन आदा करणे हरकतीचे नाही. शासन परिपत्रकानुसार महाराष्ट्र जीवन प्राधिकरण यांची तांत्रिक मान्यता घेणे गरजेचे आहे. सदर तांत्रिक मान्यता घेणे साठीची मंजुरी शुल्काची रक्कम प्रकल्प किंमती मध्ये समावेश करणेत येणार आहे.मंजुर प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार संस्थेने करार करताना प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार शुल्काच्या 3% अतिरिक्त सुरक्षा ठेव रक्कम नगरपरिषदेकडे संस्थेने जमा करावयाची आहे.

स्वच्छ भारत अभियान नागरी 2.0 अंतर्गत विटा नगरपरिषद विटा करिता घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प तयार करणेस व याबाबतची सर्व कामे विहित वेळेत पूर्ण होणेकारिता तसेच प्रकल्पांची सक्षमपणे अंमलबजावणी करण्यासाठी करार करून घेऊन तसेच अंदाजित प्रकल्प किमतीच्या 3% अतिरिक्त कामगिरी सुरक्षा ठेव जमा करून घेऊन समर्थ इंजिनिअर्स पुणे यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नियुक्ती करणेस संबधित प्रशासकीय विभाग यांनी प्रस्तावित करुन प्रमाणित केलेप्रमाणे व मुख्याधिकारी यांनी शिफारस केलेप्रमाणे महाराष्ट्र शासन, नगर विकास विभाग शासन आदेश क्रमांक एम.सी.ओ/प्र.क्र.79/नवि 14 दि.24/12/2021 तसेच महाराष्ट्र नगरपरिषद, नगरपंचायती व औद्योगिक नगरी अधिनियम 1965 चे कलम 317 (3) अन्वये मला प्राप्त झालेल्या अधिकारानुसार मी प्रशासक, विटा नगरपरिषद विटा तथा उपविभागीय अधिकारी स्वच्छ भारत अभियान नागरी 2.0 अंतर्गत विटा नगरपरिषद विटा करिता घनकचरा व्यवस्थापन प्रकल्प तयार करणेस व यासाठी समर्थ इंजिनिअर्स पुणे यांची प्रकल्प व्यवस्थापन सल्लागार (PMC) म्हणून नियुक्ती करणेस प्रशासकीय व वित्तीय मंजुरी प्रदान करीत आहे तसेच या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेस मुख्याधिकारी यांना प्राधिकृत करत आहे.

सही/-<br>
(संतोष भोर)<br>
प्रशासक<br>
विटा नगरपरिषद, विटा

**विषय** :- घनकचरा प्रकल्प येथील प्रकल्प हद्दीला लागून असलेल्या शेतकरी यांचे कडून पाणी घेणे बाबत….
**संदर्भ** :- १. मा. मुख्याधिकारी यांनी भांडार विभागाची दि. 21/03/2023 रोजीची मंजुर केलेली टिपणी.

---

ठराव क्रमांक. 156
दिनांक. 21/03/2023

वरील विषयास अनुसरून सादर करणेत येते कि, विटा नगरपरिषदेच्या घनकचरा प्रकल्प केंद्र गट नं ५६६/3 मध्ये आहे. सदर ठिकाणी खालील तक्त्यात नमूद प्रक्रियेसाठी किमानपाणी आवश्यक असते.

| **अनु क्र** | **प्रक्रिया** | **संख्या** | **आवश्यक पाणी** | **एकूण आवश्यक पाणी ( लिटर)** |
|---|---|---|---|---|
| 1 | कम्पोस्ट पिट | १८ | प्रति पिट **१०० लिटर** | १८०० |
| २ | बायोगॅस | ५ टन | १५०० प्रति टन | ७५०० |
| ३ | वृक्ष | ३८० | प्रति झाड २ लिटर प्रति दिन | ७६० |
| ४ | बाथरूम | १ | २०० लीटर | २०० लीटर |
| ५ | इतर | - | - | २०० |
| **एकूण** | | | | १०,४६० लीटर |

सदर ठिकाणी नगरपालिकेचे पाणी कनेक्शन आहे. परंतु त्यास वरील गरज भागविले जाईल इतके पाणी उपलब्ध होत नाही. यासाठी दररोज पाणी टँकर मागविला जातो.

सदरचे शेतकरी प्रकल्पाच्या हद्दीला लागून एकदम जवळचे आहेत. तसेच त्यांची स्वतःची विहीर असून त्या विहिरीस पाण्याची उपलब्धता देखील आहे. यास्तव नगरपालिकेस पाईपलाईन करणेस कमी खर्च येईल व आवश्यक पाण्याची उपलब्धता होईल.

सदर शेतकरी यांच्याशी करार करून प्रति दिन एक तास पाणी खरेदी केल्यास दररोज पुरेसे प्रमाणात पाणी उपलब्ध होईल, टँकरद्वारे पाणी पुरवून खर्च होणारे इंधन बचत होईल व टँकर वरील अवलंबित्व कमी होईल.
सदर शेतकरी श्री शंकर सुळे यांनी आ क्र ७७६३ दिनांक २0/०३/२०२३ रोजीच्या पत्राने प्रति दिन २०० रुपये आकाराने १०,००० लीटर पाणी देण्याबाबत कळविले आहे. यादाराने २ पैसे प्रति लीटर पाणी शंकर सुळे यांच्या कडून उपलब्ध होत आहे.

नगरपरिषदपाणीटँकर मागविल्यास सध्या ८०० रुपये प्रति खेप ५००० लीटर साठी आकारणी करते. याची तुलना केल्यास १६ पैसे प्रति लीटर खर्च येतो. तसेच याकामी मनुष्य बळ अडकून रहाते. वटँकर वरील अवलंबित्व वाढते. यामुळे सदर शेतकऱ्याशी करार करून पाणी खरेदी केल्यास सोयीचे ठरेल.

तसेच याकामी आवश्यक पाईप लाईन करणेसाठी येणाऱ्या खर्चास वित्तीय मंजुरी प्रदान करीत आहे तसेच या अनुषंगाने पुढील कार्यवाही करणेस मुख्याधिकारी यांना प्राधिकृत करत आहे.

सही/-

**प्रशासक तथा उपविभागीय अधिकारी**

**विटा नगरपरिषद विटा**